करण्याचे वेळेस मुळ सर्व्हे नं. ५८/२चा सर्व्हे नं. ५८/३ झाला त्यामुळे फेरफार ५८/३ चा घेतला आहे. दोन्ही सर्व्हे नं. चे क्षेत्रफळ सारखेच आहे. प्रतिवादी यांचे ताब्यात असलेल्या जमीनीशी अपिलार्थीचा काहिही संबधी नाही.

Website: www.word-pdf-convert.com

उभय पक्षाचा युक्तीवाद कनिष्ठ कोर्टाची प्रकरणे व त्यात पारित केलेले आदेश यांचे अवलोकन केले प्रकरणातील मंडळ अधिकारी लोणार व तलाठी पिंपळनेर यांच्या दिनांक २९.७.२००८ स्थळनिरिक्षणा मध्ये नमुद केले आहे की, चुक दुरुस्तीचे क्षेत्र हे मोजणी व जुने रेकॉर्ड यावरुन स्पष्ट होवु शकेल कनिष्ठ कोर्टाने आदेश पारित करतांना फेरफार क्र. २६९ रुजुवात दिनांक १०.५.१९५४, फेरफार क्र. १०५९ रुजुवात दिनांक २२.६.१९७३ आणि फेरफार क्रं. ९७६ रुजुवात दिनांक १५.१२.१९६६ हया बाबत स्पष्टपणे उल्लेख न केल्याने त्यांनी पारित केलेले आदेश हे संदिग्ध स्वरुपाचे असल्याची माझी खात्री झालेली आहे. सबब प्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

अपिलार्थीचे अपील मंजूर करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी, मेहकर यांनी राजस्व अ.प्र.क्र. आरटीएस-५९/पिंपळनेर /४०/२००८-०९ मध्ये दिनांक ५/६/२००९ रोजी पारीत केलेला आदेश रद्द ठरविण्यात येत आहे.

खर्चाबाबत आदेश नाहीत.

(के.एम.कामुने)
अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा

प्रतिलिपी

१) उप विभागीय अधिकारी, मेहकर यांना त्यांच्या फाईलवरील राजस्व अ.प्र.क्र. आरटीएस-५९/पिंपळनेर /४०/२००८-०९सह माहिती उचित कार्यवाही करीता अग्रेषित.

२) नायब तहसिलदार लोणार यांना त्यांच्या फाईलवरील राजस्व .प्र.क्र. आरटीएस-५९/पिंपळनेर /३/२००८-०९सह माहिती उचित कार्यवाही करीता अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा

Website: www.word-pdf-convert.com

**के.एम.कामुने, अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे न्यायालय**

**अ.प्र.क्र. आरटीएस-५९/पिंपळनेर/२९/२००८-०९**



श्री. दत्ता मारोती दराडे
रा. पिंपळनेर ता. लोणार जि. बुलडाणा - - अपिलार्थी

**विरुध्द**

श्री. रामाप्रसाद श्रीराम दराडे
रा.पिंपळनेर ता. लोणार जि. बुलडाणा प्रतिवादी

## आदेश

( पारित दिनांक ०६ ऑगस्ट, २०१० )

मौजे पिंपळनेर ता.लोणार येथिल शेत सर्व्हे नं. ५८/३ गट नं. ३३० मध्ये नजर चुकीने तत्कालीन तलाठी यांचे कडुन क्षेत्रफळात झालेली चुक दुरुस्त करण्याकरीता गांव नमुना ६ फेरफार क्र. २६९ दिनांक १०.५.१९५४ नुसार श्रीराम पांडु दराडे यांचे नांवाने सर्व्हे नं. ५८/३ गट नं. ३३० मधील ८ एकर ३५ गुंठ्याची दुरुस्ती करण्याबाबत नायब तहसिलदार लोणार यांनी रा.प्र.क्र. आरटीएस ५९/पिंपळनेर /२ /२००८-०९ मधील दिनांक २५/११/२००८ अन्वये आदेशीत केले आहे. हया आदेशाने व्यथित होवुन अपिलार्थी यांनी उप विभागीय अधिकारी मेहकर यांचेकडे अपिल दाखल केले होते. उप विभागीय अधिकारी मेहकर यांचे कडील रा.अ.प्र.आरटीएस ५९/पिंपळनेर/४०/२००८-०९ मधील दिनांक ५.६.२००९ अन्वये अपिल खारीज करण्यात येवुन नायब तहसिलदार लोणार यांचा आदेश कायम करण्यात आला आहे. या आदेशा विरुध्द अपिलार्थी यांनी सदर अपिल दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी प्रकरणात स्थगनादेश मिळण्या करीता स्वतंत्र अर्ज दाखल केलेला आहे.

प्रकरण पंजीबध्द करण्यात येवुन प्रतिवादी यांना नोटिस देण्यात आलेली आहे.

स्थगनादेश अर्जावर अपिलार्थी यांचे वकिलांचे म्हणने ऐकुण घेवुन प्रकरणात पुढील आदेशापावेतो जैसेथे (status quo)आदेश देण्यात आला आहे.

सदर अपिल प्रकरणात अपिलार्थी यांचे वकिलानी लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे.त्यात त्यांनी नमुद केले आहे की, प्रतिवादी हे अपिलार्थीचे चुलत भाऊ आहेत. अपिलार्थीचे वडिल मारोती दराडे यांना सन १९४५ साली गोपाल महादु वंजारी यांना दत्तक घेतले होते. दत्तक विधान समाजातील रितीरीवाजा नुसार व कायद्याला धरुन करण्यात आले.प्रतिवादी हे गोपाल महादु वंजारी यांचे नातेवाईक नव्हते व नाहीत. १९६६ साली गोपाल वंजारी यांनी सर्व्हे नं. ५८/३.अ मधील अर्ध्री जमीन अपिलार्थीचे व प्रतिवादीचे वडिलांना वाटुन दिली आहे. त्या बाबतच्या नोंदी महसुल दप्तरी त्याच वेळी घेण्यात आल्या आहेत. फेरफार क्र. ९७६ असा आहे. त्याच वेळी सर्व्हे नं. ५९/२ मधील जमीनीची सुध्दा वाटणी झालेली आहे. प्रतिवादी यांनी बनावट बक्षीसपत्र तयार केले आहे. व त्या आधारे खोटया नोंदी घेण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे शेत सर्व्हे नं. ५८/३.अ मधील जमीनी अपिलार्थी व प्रतिवादी यांचे नांवे ठेवण्यात यावी. नायब तहसिलदार लोणार व उप विभागीय अधिकारी मेहकर यांनी दिलेला आदेश रद्द करुन अपिल मंजुर करण्यात यावे.

प्रतिवादी यांचे वकिलांनी पुरशीस दाखल करुन उप विभागीय अधिकारी मेहकर व नायब तहसिलदार लोणार यांचे न्यायालयात दाखल केलेला युक्तीवाद हाच लेखी युक्तीवाद समजण्यात यावा असे नमुद केले आहे.

प्रतिवादी यांनी उप विभागीय अधिकारी मेहकर यांचे कोर्टात दाखल केलेल्या युक्तीवादामध्ये नमुद केले आहे की, सर्व्हे नं. ५८/३ मधील ८ एकर ३५ गुठ्ठे जमीन ही त्यांचे वडिल श्रीराम पांडुजी दराडे यांना गोपाबाई महादजी दराडे यांना दिनांक २३.४.१९५३ रोजीच्या बक्षीस पत्रान्वये दिलेली आहे. तेव्हापासुन जमीन ताब्यात आहे. सदर जमीनीचा मुळ मालक गोपाबाई ,जनाबाई व शोभाबाई होत्या व हया तिघींनी बक्षीसपत्राने दिलेली आहे.त्यानुसार दिनांक ५.८.१९६० रोजी फेरफार घेतला तो रुजु होवुन सर्व्हे नं. ५८/२ मधील ८ एकर ३५ गुंठ्ठे जमीन प्रतिवादीचे वडिलांचें नावे केली. एकत्रित